प्रेस रिलिज

प्रेस रिलेशन डिव्हीजन, सेंट्रल ऑफिस, पो.ऑ.बॉक्स ४०६, मुंबई ४००००१
फोन नं.२२६६०५०२, फॅक्स २२६६०३५८, २२७०३२७९

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया**
www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

जानेवारी २३, २००६

# अकाउंट पे चेक्स तिसऱ्या खातेदाराच्या खात्यात जमा करण्यास बंदी

इनिशियल पब्लिक ऑफर (आयपीओ) कार्यप्रणालीचा काही व्यक्तींकडून होत असलेला दुरुपयोग तसेच सिक्युरिटीज् ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) कडून आलेले रिपोर्टस् लक्षात घेऊन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने व्यवस्थेचा उपयोग करुन घेण्यासाठी काही व्यवसायीकांच्या गुन्हे कार्यप्रणालीची खात्री करुन घेण्यासाठी काही बँकांमध्ये तपशीलात जाऊन तपास केला असता असे दिसून आले आहे की, वारंवार सुचना देऊनही, बँका वैयक्तिक खात्यांमध्ये जमा पे रिफंड ऑर्डर्स, डीपी प्रोव्हायडर्सच्या संगनमताने, वैयक्तिक खात्यात जमा न करता ब्रोकर्सच्या खात्यात जमा करताना दिसत आहेत. हा पेमेंट सिस्टिमचा गैरवापार असून, यातूनच अनियमित व्यवहारांचा जन्म होत असतो. अकाउंट पे चेक्ससाठी असलेल्या सुचनांपासून बँका दूर गेल्यानेच हा दुरुपयोग होत आहे. बँकांच्या अशा वर्तणुकींमुळे भविष्यात बँकांना वेगवेगळ्या धोक्यांची शक्यता असल्याने, बँकांच्या नियमांना बगल देऊन काम करण्याचे, असे समर्थनहि होऊ शकत नाही

अकाउंट पे चेक्स, ज्याचे नाव आहे त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याहि खात्यात जमा करण्यास बँकांना मनाई करण्याची रिझर्व्ह बँकेला आता आवश्यकता वाटते. त्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने, बँकांना आदेश दिले आहेत की, ज्या नावावर खाते आहे त्या खातेदाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तींकडून बँकांनी चेक्स स्विकारु नयेत.

या संदर्भातील परिपत्रक रिझर्व्ह बँकेच्या वेबसाईट www.rbi.org.in वर प्रदर्शीत करण्यात आले आहे.

**पी. व्ही. सदानंदन**
व्यवस्थापक

**प्रेस रिलिज: २००५-२००६/९२८**